महाराष्ट्र शासन

क्रमांक : विसआ-२०१७/३७३/प्र.क्र.१८५/सहा
संसदीय कार्य विभाग, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑक्टोबर, २०१७.

<u>संदर्भ</u> :- १) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : एसआरव्ही-२००४/प्र.क्र.१५/४/१२, दिनांक २५ मे, २००६.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण-२०१२/प्र.क्र.५४/१८(र.व.का.), दिनांक ११ ऑगस्ट, २०१४.

<u>कार्यालयीन आदेश</u>

संदर्भाधीन दिनांक २५/५/२००६ च्या शासन अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ प्रसारित करण्यात आला आहे. सदर अधिनियमाच्या कलम ९(१) व (२) अन्वये विभागाशी / कार्यालयाशी संबंधित सर्व बाबींवर अंतिम निर्णय घेण्याच्या दृष्टीने प्रकरण सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर निर्धारित करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत.

२. त्यानुसार, या कार्यासनाशी संबंधित बाबींवर अंतिम निर्णय घेण्यासाठी प्रकरण सादर करणाऱ्या अधिकाऱ्यांचे तीन स्तर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत :-

अ.क्र.	विषय	स्तर			अंतिम निर्णय घेण्यास सक्षम अधिकारी / प्राधिकारी
		प्रथम	द्वितीय	तृतीय	
१.	विधानसभा सभागृहात प्रत्येक अधिवेशनात शासनातर्फे देण्यात आलेली आश्वासने तपासून व चिन्हांकित करुन संबंधित विभागाकडे पाठविणे.	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव/प्रधान सचिव
२.	संबंधित विभागांकडून पूर्तता झालेली आश्वासनांची विवरणपत्रे विधानसभेच्या पटलावर ठेवणे.	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव/प्रधान सचिव/मा. मंत्री
३.	अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचेकडून प्राप्त विधानसभा सदस्यांच्या विशेषाधिकारभंग सूचनांवर कार्यवाही करणे.	कक्ष अधिकारी	अवर सचिव	सह सचिव / उप सचिव	सचिव/प्रधान सचिव

वरील स्तराबाबत, वरिष्ठ अधिकाऱ्यांचे निदेश असल्यास किंवा काही विशिष्ट अपवादात्मक प्रकरणी आवश्यकता भासल्यास प्रकरणपरत्वे योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

३. सदर कार्यालयीन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१२१५२१४१११५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Tikamdas N. Shikharame
Date: 2017.10.12 15:11:08 +05'30'

(टि. न. शिखरामे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२. उपसचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३. उप सचिव (कार्यासन-१८)(र.व.का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४. संसदीय कार्य विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५. निवडनस्ती (कार्यासन-६)